वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

# लोकशाहीच्या उत्सवात मतदारांचा सहभाग

## जिल्ह्यात सहा विद्यमान आमदार, तीन माजी आमदारांसह अनेक उमेदवारांचे भविष्य मतपेटीत बंद;२३ ला निकाल

## परळीत राडा, मतदान केंद्राची तोडफोड, आप आपसात मारामारी



दिव्य वार्ता

## बीडमध्ये शांततेत मतदान, संदीप क्षीरसागर विरूध्द योगेश क्षीरसागरात झाली फाइट

## अपक्ष उमेदवारांचा थांग पत्ता लागला नाही







# परळीत शरद पवार गटाच्या नेत्याला मुंडे समर्थकांची मारहाण

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज राज्यभरात मतदान प्रक्रिया पार पडत आहे. मतदानामुळे सर्वत्र पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त आहे, पण अशातही अनेक ठिकाणी मारहाण अन् मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण केल्याच्या घटना घडत आहेत. बीड जिल्ह्यातील हायव्होल्टेज अशा परळी मतदारसंघात अशाच प्रकारच्या घटना घडल्या आहेत.

परळी मतदारसंघातील एका मतदान केंद्राबाहेर धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्याने शरद पवार गटाच्या नेत्याला मारहाण केल्याची घटना घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने हा व्हिडीओ एक्सवर या घटनेचा व्हिडिओही शेअर केला आहे. यासह दावा केला आहे की, मारहाण करणारे लोक भाजप आणि धनंजय मुंडेंचे समर्थक आहेत.

शरद पवार गटाने व्हिडीओ शेअर करत म्हटले की, लोकशाहीच्या उत्सवात ठोकशाहीने मतांची बेगमी करणाऱ्या धनंजय मुंडे गटाच्या गुंडांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे युवक प्रदेश सरचिटणीस माधव जाधव यांना मारहाण केली. ही घटना निंदनीय आहेच पण राज्यातील ढासळलेल्या कायदा सुव्यवस्थेचे द्योतक सुद्धा आहे. अशा घटनांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष जाहीर निषेध करतो!

# परळीत गैरप्रकार, कॅमेरे बंद ठेवले;

## महिलांनी भितीच्या वातावरणात केले मतदान

परळी: परळी विधानसभा मतदारसंघातील एकूण ३६३ मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजता मतदानास प्रारंभ झाला आहे. येथे महायुतीचे उमेदवार कृषिमंत्री धनंजय मुंडे व महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या मध्ये दुरंगी लढत होत आहे. सकाळी नऊ वाजेपर्यंत ७.०८ टक्के मतदान झाले आहे. परळी विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख ३७ हजार ९७६ एवढे मतदार आहेत. सकाळी सात ते नऊ दरम्यान १५ हजार ७०० पुरुष व ८ हजार २३६ महिला मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर हे मतदारसंघातील परिस्थितीकडे लक्ष ठेवून आहेत.

मतदारसंघातील तीन ठिकाणी मतदान प्रक्रिया दरम्यान गैरप्रकार होत असल्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे .परळी शहरातील जलालपूर व तालुक्यातील धर्मापुरी येथे मतदारांना दमदाटी करण्यात येत असल्याचा प्रकार बुधवारी सकाळी घडला आहे. जलालपूर येथील काही महिलांना मतदान करण्यास गेले असता तुम्ही कोणाला मतदान करत आहेत असे म्हणून काही जण पाहू लागले व भीतीच्या वातावरणात या ठिकाणी महिला मतदान करीत आहेत.

तसेच धर्मापुरी येथील एका केंद्रावर वेबकॉस्टिंगच्या कॅमेऱ्याची पिन लावण्यात आली नव्हती. त्यामुळे या ठिकाणी विना कॅमेरा मतदान चालू होते. या ठिकाणी तातडीने उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी भेट देऊन कॅमेरे चालू करण्यास भाग पडले. दरम्यान, राजेसाहेब देशमुख व काही कार्यकर्त्यांमध्ये वादावादी झाल्याचा प्रकार धर्मापुरी येथील मतदान केंद्रावर घडला आहे. राजेसाहेब देशमुख यांनी परळी मतदारसंघात बोगस मतदान होत असल्याचा आरोप केला आहे. निवडणुकीत पैशाचा धुरळा व गुंडांचा वापर करण्यात येत असल्याचा आरोप करीत राजेसाहेब देशमुख यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली आहे. केंद्रीय सुरक्षा बलाच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती मतदान प्रक्रिया घेण्याची मागणी ही राजेसाहेब देशमुख यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.









## बीडमध्ये तुतारी जोरात वाजली, गेवराईत मशाल पेटली, आष्टी तुतारी कमळमध्ये फाइट, माजलगावात जगताप आडसकरांमध्ये फाइट, केजमध्ये तुतारी वाजणार, परळीत मुंडें की देशमुख मुकाबला कडक












# ईव्हीएम मशीनचा क्रम चुकला;

## महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंकेंचा पारा चढला

बीड: जिल्ह्यातील माजलगावच्या दिंद्रुड येथे मतदान बूथ केंद्र क्रमांक १९९ मध्ये ईव्हीएम मशीन ठेवताना चुकलेल्या क्रमामुळे मतदान प्रतिनिधीने आक्षेप घेतला. याची माहिती मिळताच महायुतीचे उमेदवार तथा आमदार प्रकाश सोळंके यांनी मतदान केंद्रांवर धाव घेतली. येथे निवडणूक अधिकाऱ्याला जाब विचारत वरिष्ठ अधिकाऱ्यांना सोळंके यांनी माहिती दिली. त्यानंतर ईव्हीएम मशीनचा क्रम दुरुस्त करण्यात आल्याची माहिती आहे.



मतदान प्रतिनिधी धैर्यशील ठोंबरे यांनी सकाळी मतदान करते वेळी ईव्हीएम मशीनचा क्रम ३, २, १ असा उलटा असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना याबाबत सूचित केले, मात्र, अधिकाऱ्यांनी याची दखल घेतली नाही. याची माहिती मिळताच महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांनी तत्काळ दिंद्रुड येथे मतदान केंद्रावर धाव घेतली. एकूण सहा बूथ असताना एकाच बुथवर हा क्रमांक कसा चुकला याबाबत आमदार सोळंके यांनी अधिकाऱ्याला जाब विचारला. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे याची माहिती दिली. त्यानंतर ईव्हीएम मशीनचा क्रम दुरुस्त करण्यात आला.



# मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात सर्वात कमी मतदान

# बीड जिल्ह्यात ६०.६२ टक्के मतदान

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्यातील २८८ मतदारसंघात आज सकाळी ७ वाजलेपासून मतदान सुरू झालं असून दुपारनंतर मतदानाची टक्केवारी वाढताना दिसून येत आहे. त्यानुसार, राज्यातील २८८ मतदारसंघाच्या ३६ जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी समोर आली आहे. राज्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झालं असून मतदारांचा उत्साह शेवटच्या टप्प्यात अधिक दिसून आला. त्यामध्ये, सर्वाधिक मतदान हे नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात झालं असून सर्वात कमी मतदान ठाणे जिल्ह्यात झालं आहे. गडचिरोलीत ६९.६३ आणि ठाणे जिल्ह्यात ४९.७६ टक्के मतदान झालं आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी राज्यात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झालं आहे. त्यामध्ये, सर्वाधिक मतदान गडचिरोली जिल्ह्यात झालं असून गडचिरोलीत ६९.६३ टक्के मतदान झालं आहे. त्यानंतर, भंडारा जिल्ह्यात ६५.८८ टक्के मतदान झालं असून गोंदिया जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. या जिल्ह्यात ६५.०९ टक्के मतदान झालं आहे. आत्तापर्यंत सर्वाधिक कमी मतदानाचा विचार केल्यास, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यात ४९.७६ टक्के एवढे कमी मतदान झालं आहे.

# भरारी पथकाची कारवाई, ५४६ कोटींची मालमत्ता जप्त

## रोकड, मौल्यवान वस्तूंसह सोने-चांदी ताब्यात


मुंबई (दिव्य न्युज)/:- राज्यातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भरारी पथकाकडून आत्तापर्यंत मोठी रक्कम जप्त करण्यात आली आहे. अवैध मार्गाचा पैसा किंवा बेहिशोबी मालमत्ता निवडणूक स्थिर पथके, पोलीस यंत्रणा व भरारी पथकाने जप्त केली आहेत. त्यानुसार, गेल्या महिनाभरात ५४६ कोटी ८४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. तर, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी-व्हिजिल पवर एकूण ७ हजार ४०० तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ७ हजार ३६० तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. दरम्यान, पुढील ४ दिवसांत निवडणूक प्रचारसभांची सांगता होईल, त्यानंतरीही आदर्श आचारसंहिता लागू असणार आहे.

राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ५४६ कोटी ८४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. त्यामुळे, राज्यभर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे पाहायला मिळते. आता निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात आला असून पुढील काही दिवसांत प्रचारांची सांगता होणार आहे. त्यानंतर, २० नोव्हेंबर रोजी राज्यात महाराष्ट्रातील २८८ मतदारसंघात मतदान होऊन २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर केला जाईल. मात्र, निवडणूक निकालाच्या तारखेपर्यंत राज्यात आदर्श आचारसंहिता सुरूच राहणार आहे. त्यामुळे, २३ नोव्हेंबरपर्यंत आचारसंहिता भंग संदर्भात नागरिकांना, उमेदवारांना आणि इतरांनाही आचारसंहिता भंगबाबत तक्रार देता येईल.



दरम्यान, मुंबई, पुणे, भिवंडी, ठाणे यांसह मराठावाड्यातही पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात रोकड जप्त करण्यात आली आहे. तर, शुक्रवारीच अमरावतीत पोलिसांनी ५ कोटी रुपयाचं सोने-चांदी घेऊन जाणारं वाहन केलं जप्त होतं. त्याबाबत शहरातील नागपुरी गेट पोलिसांकडून अधिकचा तपास सुरू आहे. मात्र, सिक्वेल लॉजीस्टिक नागपूर यांच ते वाहन असल्याची प्राथमिक माहिती आहे. हे वाहन नागपूरवरुन सोने आणि चांदीचे दागिने घेऊन विविध जिल्ह्यात वितरण करत असते. विशेष म्हणजे हेच वाहन तिवसामध्ये सुद्धा काही दिवसांपूर्वी पकडले होते. त्यावेळी ६४ किलो सोने आणि चांदीचे दागिने होते, पण तीन दिवसानंतर ते वाहन सोडून देण्यात आले होते.सी-व्हिजिल पद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे प कोणत्याही पस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

# बिटकॉइन घोटाळ्यातील ऑडिओ क्लिपमध्ये आवाज सुप्रिया सुळे आणि पटोलेंचाच; अजित पवार



बारामती, (दिव्य न्युज):- बिटकॉइन घोटाळ्यातील ऑडिओ क्लिप प्रकरणाची निपक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. त्याबद्दल एकायला मिळते, त्यांनी काय मांडले. मी नाना पटोले आणि सुप्रिया सुळे यांचा आवाज चांगला ओळखतो. त्यामुळे ते आवाज त्या दोघांचेच आहेत. चौकशीनंतरच यामागील गुपित काय आहे ते बाहेर येईल, अशी प्रतिक्रीया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्यावरील बिटकॉइन बाबत भाजपकडुन झालेल्या आरोपाबाबत व्यक्त केली आहे. काटेवाडी येथे बुधवारी (ता. २०) सकाळी सातच्या दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेसाठी मतदान केले. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी पत्रकारांशी बोलताना त्यांनी हा दावा केला आहे.

यंदाची निवडणुक अवघड वाटते का? या पत्रकारांच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, लोकसभेप्रमाणे विधानसभेला देखील आमच्या घरातीलच उमेदवारांमध्ये लढत आहे. कोणतीही निवडणुक आम्ही गांभीर्याने घेतो. हि निवडणुक विकासावर लढायची होती. सकारात्मक दृष्टीने तसेच आम्हाला कोणावर टीका करायची नव्हती. माझे समर्थक, प्रचार यंत्रणांनी तीच भुमिका घेतल्याचे पवार म्हणाले. बारामती आणि महाराष्ट्राच्या व्हीजनवर मी मते मागितली. याबाबत बारामतीकरांचा अधिकार आहे, मात्र मला पूर्ण विश्वास आहे की बारामतीकर यंदा मला चांगल्या मतांनी निवडून देतील. बारामती मध्ये भावनिक राजकारण होते काय या प्रश्नावर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले मी कधी भावनिक राजकारण केले? तुम्ही माझ्या सांगता सभेतील भाषण पाहिले असेल यावेळी मी फक्त मी पाच वर्षांमध्ये काय केले. बारामतीत पुढील पाच वर्षात काय करणार आहे याचा लेखाजोखा मांडला. मला विश्वास आहे की बारामतीकर यंदा देखील मला मोठ्या मताधिक्याने निवडून देतील,असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

# काँग्रेस एक नंबरचा पक्ष ठरेल, मविआचे सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेष- नाना पटोले

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राची स्वाभिमानी जनता महाराष्ट्राच्या हिताचे सरकार निवडेल. राज्यातील जनतेचा प्रतिसाद पाहता काँग्रेस पक्ष सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून येईल. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार ही काळ्या दडगावरची रेष आहे, असा ठाम विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

पत्रकारांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भाजपाने निवडणुकीत संविधान व्यवस्थेचे उल्लंघन केले. भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे विरारच्या हॉटेलमध्ये पैसे वाटताना पकडले गेले. तावडेंचा तो मतदारसंघ नसताना ते तेथे काय करत होते? कार्यकर्त्यांना भेटायला गेलो हा तावडेंचा बचाव चुकीचा आहे. प्रचार संपल्यानंतर मतदारसंघाबाहेरच्या नेत्यांना थांबता येत नाही असा नियम आहे, त्यामुळे विनोद तावडे जे सांगत आहेत ते खोटे आहे. आर्वी विधानसभेचे भाजपा उमेदवार वानखेडे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहायक आहेत, या वानखेडेंच्या गोदामात दारुच्या बाटल्यांचा साठा सापडल्या. वर्धा जिल्ह्यात दारुबंदी असतानाही हा दारु साठा कसा आला? मतदारांना पैसे व दारु वाटून भाजपाचा मते मिळवण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

लोकसभेत व्होट जिहाद झाल्याचा भाजपाकडून अपप्रचार केला जात आहे. एखाद्या जात समुहाने एका पक्षाला मतदान करा असे आवाहन केले तर त्याला भाजपा व्होट जिहाद म्हणतो. मतदान कोणाला करायचे हा मतदाराचा हक्क आहे. आता एका समाजाने भारतीय जनता पक्षाला मतदान करण्याचे आवाहन केले, त्यालाही 'जिहाद' म्हणायचे का? अशी विचारणा नाना पटोले यांनी केली.

# भाजपला फटका बसणार, शिंदेंनाही 'दे धक्का'

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्यातील २८८ मतदारसंघातील विधानसभेच्या निवडणुकांसाठी घेण्यात आलेल्या मतदानानंतर आता एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत. विविध सर्वेक्षण संस्थांच्या सर्व्हेतून आलेली आकडेवारी वेगवेगळी आहे. मात्र, महाविकास आघाडी व महायुती यांच्यात काँटे की टक्कर होत असून कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील हेही या सर्वेक्षणातून समोर आलं आहे. चाणक्या स्ट्रॅटेजी, इलेक्ट्रोल एज, पोल डायरी आणि मॅट्रीझ या चार संस्थांकडून मतदानानंतरचे एक्झिट पोल अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यानुसार, भाजपला सर्वाधिक जागा मिळतील असा अंदाज या सर्वेक्षणातून वर्तवण्यात आला आहे. त्यामध्ये, भाजपला जास्तीत जास्त १०८ आणि कमीत कमी ७७ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर, ४ पैकी तीन संस्थांकडून तीन संस्थांकडून महायुतीला सर्वाधिक जागा मिळतील, असा अंदाज असून एका संस्थेनेच महाविकास आघाडीला सर्वाधिक जागा येतील असा अंदाज वर्तवला आहे.

राज्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विधानसभा निवडणूक एक्झिट पोल अंदाज समोर आले आहेत. त्यामध्ये, महायुतीचं पारडं जड असल्याचं दिसून येत आहे. मात्र, एडएउढजठ-ङ एऊऋए या सर्वेक्षण संस्थेकडून महाविकास

## एक्झिट पोलमधून समोर आली आकडेवारी

आघाडीला सर्वाधिक जागा मिळतील असा अंदाज आहे. या सर्वेक्षणानुसार महाविकास आघाडीला १५० जागांवर यश मिळू शकते, तर २० जागा इतर पक्ष व अपक्षांच्या पारड्यात जाऊ शकतात. तीन संस्थांकडून महायुतीला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसून येते. त्यानुसार, महायुतीला १५२ ते १६० जागांवर भाजपा महायुतीला यश मिळण्याची शक्यता आहे. या सर्वच सर्वेक्षणात भाजपला सर्वाधिक जागा जिंकण्याचा अंदाज आहे. त्यामध्ये, महाविकास आघाडीची सत्ता दर्शवणाऱ्या एडएउढजठ-ङ एऊऋए च्या सर्वेक्षणानुसार भाजपचं सर्वाधिक ७८ जागा जिंकेल असा अंदाज आहे. त्यामुळे, राज्यात भाजपने १४८ जागांवर निवडणूक लढवली असता, ७८ ते १०८ जागांवर भाजपला यश मिळू शकते. मात्र, गत २०१९ च्या निवडणुकीत भाजपला १०५ जागांवर यश मिळालं होतं. त्यामुळे, यंदाच्या निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता असून त्यांच्या जागा घटणार असल्याचं सर्वेक्षणातून दिसून येत आहे.

मतदानानंतर आलेल्या या सर्वेक्षण संस्थांच्या अंदाजानुसार भाजपला सर्वाधिक १०८ पर्यंत जागा मिळू शकतात. तर, भाजपला सर्वात कमी ७८ जागांवर विजय मिळेल असा अंदाज आहे. त्यामुळे, गत २०१९ च्या निवडणुकीपेक्षा भाजपला यंदाच्या निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता आहे.

# 'आधी लगीन लोकशाहीचं'

## नववधूने हळदीच्या मंडपातून थेट गाठलं मतदान केंद्र,

मुंबई , (दिव्य न्युज):- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. येत्या २३ नोव्हेंबरला शनिवारी मतमोजणी होणार आहे. दरम्यान आज राज्यात सर्वत्र मतदानाचा उत्साह दिसून येत आहे. मतदार मोठ्या उत्साहात मतदानासाठी घराच्या बाहेर पडत आहेत. नव्वदी पार वृद्धांपासून ते नवमतदार तरुणांपर्यंत सर्वांनी आज आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. दरम्यान पालघर जिल्ह्यातल्या विरारमध्ये हळदीच्या मंडपातून येवून एका नववधूने आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. सायली राजेंद्र वर्तक असं या तरुणीचं नाव आहे.

पालघर जिल्ह्यातल्या विरारमध्ये हळदीच्या मंडपातून येवून एका नववधूने आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. सायली राजेंद्र वर्तक (वय २९) वर्षे असे मतदान केलेल्या नववधूचे नाव असून ती एका खाजगी बँकेत मॅनिजर पदावर काम करते. तीने विरार पूर्व फुलपाडा जनकपूर धाम येथील लोकमान्य हिंदी हायस्कूल मधील बुथ केंद्रावर जावून आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.सायलीचे लव्ह मॅरेज असून २३ नोव्हेंबर रोजी राजस्थानच्या उदयपूर येथे तिचा विवाह होणार आहे. यावेळी बोलताना सायलीनं सर्वांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. मी माझा मतदानाचा हक्क बजावला आहे, तुम्ही देखील तुमच्या मतदानाचा हक्क



बजावला पाहिजे असं सायलीने म्हटलं आहे.

आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील दोन प्रमुख पक्षामध्ये फूट पडली. शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फुटीनंतर ही पहिलीच विधानसभेची निवडणूक आहे. शिवसेनेतून एकनाथ शिंदे यांनी उठाव केला त्यानंतर ते भाजपच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री बनले, दुसरीकडे अजित पवार यांनी देखील शरद पवार यांची साथ सोडत भाजपला पाठिंबा दिला आणि सत्तेत सहभागी झाले. या सर्व घडामोडींनंतर ही पहिलीच निवडणूक असल्यानं मतदार राजा कोणाच्या बाजुनं कौल देणार? राज्यात कोणाचं सरकार येणार महाविकास आघाडी की महायुती? याबाबतची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

# पुण्यात आगळावेगळा उपक्रम हक्क बजवा अन् पुस्तक भेट मिळवा, दीड हजार मतदारांनी घेतला लाभ



पुणे, (दिव्य न्युज):- ''मतदानाचा हक्क बजवा आणि पुस्तक भेट मिळवा, असा आगळावेगळा उपक्रम बुधवार पेठेतील साईनाथ मंडळ ट्रस्ट, नारायण पेठेतील माती गणपती व संयुक्त प्रसाद मित्र मंडळ यांनी मंगळवारी राबवला. तब्बल दीड हजार मतदारांनी याचा लाभ घेतला.

मतदानाचा टक्का वाढावा, वाचन संस्कृती रुजावी या विधायक हेतूने कसबा मतदार संघातील नागरिकांनी अधिकाधिक मतदान करावे आणि आपला मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, मतदान केलेल्या मतदारांनी बोटावरची शाई दाखवली आणि सुमारे पंधराशे मतदारांना पुस्तके भेट दिली. त्यामध्ये विविध धार्मिक, प्रवास वर्णन, ग्रंथ, पाककृती, ऐतिहासिक, प्रेरणादायी पुस्तकांचा समावेश होत. त्याकरता सकाळी आठ ते दुपारी एक या वेळेमध्ये ज्या मतदारांनी मतदान केले, त्यांना पुस्तक भेट देण्यात आली. मतदानाचे दायित्व सर्वांनी पार पाडावे, त्याचबरोबर मराठी पुस्तकाचे वाचन करावे आणि वाचन संस्कृती रुजावी याकरता या उपक्रमाचे आयोजन केले होते, असे साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियुष शहा यांनी सांगितले. संयुक्त प्रसाद मित्र मंडळाचे अध्यक्ष अजित परांजपे अनिल मोहिते, माती गणपती मित्र मंडळाचे अध्यक्ष परेश हराळे, कौस्तुभ खाकुर्डीकर , साईनाथ मंडळ ट्रस्टचे प्रशांत पंडित अमित दासानी, संकेत निंबळकर कार्यकर्त्यांनी या विधायक उपक्रमाचे आयोजन केले होते.